# ॥ श्री गणपतिस्तोत्र ॥

## छंद - अनुष्टुभ्

साष्टांग नमन हें गौरीपुत्रा विनायका ।
भक्तीनें स्मरतां नित्य आयुष्कामार्थ साधती ॥ १ ॥
प्रथम नांव वक्रतुंड दुसरें एकदंत तें ।
तिसरें कृष्णपिंगाक्ष चवथें गजवक्त्र तें ॥ २ ॥
पांचवें श्रीलंबोदर सहावें विकट नांव तें ।
सातवें विघ्नराजेंद्र आठवें धूम्रवर्ण तें ॥ ३ ॥
नववें श्री भालचंद्र दहावें श्री विनायक ।
अकरावें गणपति बारावें श्री गजानन ॥ ४ ॥
देवनांवें अशी बारा तीन संध्या म्हणे नर ।
विघ्न भीति नसे त्याला प्रभो तूं सर्वसिद्धिद् ॥५॥
विद्यार्थ्याला मिळेल विद्या धनार्थ्याला मिळे धन ।
पुत्रार्थ्याला मिळे पुत्र मोक्षार्थ्याला मिळे गति॥६॥
जपता गणपति स्तोत्र सहा मासांत हें फळ ।
एक वर्ष पूर्ण होतां मिळे सिद्धि न संशय ॥ ७ ॥
नारदांनी रचिलेलें झालें संपूर्ण स्तोत्र हें ।
श्रीधराने मराठीत पठण्या अनुवादिलें ॥ ८ ॥